# महाराष्ट्रातील वाकाटक सत्ता

बौद्ध काळात अश्मक व मुलकाची जनपदे → अशोकाच्या काळात औरंगाबाद येथे पितनगलय साम्राज्य → इ. स. पू. पहिल्या शतकात सातवाहन → इ. स. तिसऱ्या शतकात वाकाटकांची सत्ता

- सातवाहन साम्राज्यानंतर महाराष्ट्रात वाकाटक घराण्याचा उदय.
- अजिंठा लेण्यात त्यांचा उल्लेख वाकाटक वंशकेतू असा.
- वायुपुरान व बिदर ताम्रपटानुसार विंध्यशक्ती हा संस्थापक .
- पुणे तसेच वाशिम येथे सापडलेल्या ताम्रपटावरून त्यांची अधिक माहिती.
- शिवनी येथील ताम्रपटावरून प्रवरसेन दूसरा याची माहिती मिळते.
- नांदेड परिसरातील वेणगंगेच्या काठावरील शिऊर येथील लेण्याही वाकाटक कालीन अवशेष .
- वाकाटक घराने हे ब्राह्मण घराने होते.




## प्रमुख राजे

1) विंध्यशक्ती : (इ. स.250 ते 270 )

- हारीती पुत्र विंध्यशक्ती हा सातवाहन दरबारी अधिकारी होता. नंदिवर्धन परिसरात महाराष्ट्रात त्याने राज्या प्रस्थापित केले. विंध्य पर्वता पर्यन्त विस्तार म्हणून विंध्यशक्ती.
- अजंठा लेणीतील 16 व्या लेणीत त्याचा द्विज म्हणून उल्लेख. द्विज म्हणजे दोनदा जन्मलेला . ( एकदा शरीराने व एकदा आत्म्याने )

2) प्रवरसेन पहिला: (इ. स.270 ते 330 )

- विंध्यशक्ती चा पुत्र . याने सम्राट ही पदवी धारण केली. चार अश्वमेघ यज्ञ केले.
- त्याने माळवा , गुजरात प्रदेशात आक्रमण करून शकांचा पराभव केला. याने नागा राजांबरोबर युद्ध केले.
- .तो वैदिक धर्माचा अनुयायी होता आणि त्याने अनेक यज्ञ (यज्ञ) केले ज्यामध्ये अग्निस्तोम ,अप्तोर्यम, उक्थ्या, षोडसिन, अतिरात्र, वाजपेय, बृहस्पतिसव, सद्यस्करा आणि चार अश्वमेधांचा समावेश होता. पुराणानुसार वाजपेय यज्ञाच्या वेळी त्यांनी ब्राह्मणांना भारी दान केले. त्यांनी सम्राट व्यतिरिक्त धर्ममहाराजाची पदवीही घेतली.
- वाकाटकांचा वास्तव संस्थापक म्हणतात. कोसल ,कलिंग व आंध्र राज्यात समाविष्ट केले.
- वाशिम येथील शिलालेखावरून प्रवरसेन याने साम्राज्याची विभागणी गौतमीपुत्र आणि सर्वसेन या त्याच्या दोन पुत्रात केली. नंदिवर्धन या ज्येष्ठ शाखेचा प्रमुख गौतमी पुत्र तर नवीन उदयाला आलेल्या वत्सगुल्म (वाशिम)  या  शाखेचा सर्वसेन हा प्रमुख .

## ज्येष्ठ शाखा : नंदिवर्धन

1) रुद्रसेन पहिला.:  ( इ. स. 330 ते 350 )

- गौतमीपुत्र चा मुलगा. समुद्रगुप्तचा समकालीन.
- हा महाभैरव याची भक्ती करत होता.

- अलाहाबाद प्रशस्ती मध्ये त्याचा रुद्रदेव असा उल्लेख.

2) पृथ्वीसेन पहिला.: ( इ. स. 350 ते 390 )

- रुद्रसेन पहिला याचा पुत्र. विक्रमादित्य च्या समकालीन. चंद्रगुप्त दूसरा ( विक्रमादित्य ) याने शकांचा पाडाव करण्यासाठी याची मदत घेतली.
- हा शिवाचा उपासक होता.

3) रुद्रसेन दूसरा: ( इ. स. 390 ते 395 )

- पृथ्वीसेन पहिला चा पुत्र. चंद्रगुप्त दूसरा याची कन्या प्रभावती हिच्याशी विवाह.
- दिवाकर सेन व दामोदर सेन ही दोन मुले.
- प्रभावती हिने रामटेक व पवणार याठिकाणी रामाची मंदिरे बांधली.

4) प्रवरसेन दूसरा: ( इ. स. 420 ते 450 )

- दामोदर सेन हा प्रवरसेन दूसरा या नावाने गादीवर आला.
- याने महाराष्ट्री प्रकृत मध्ये सेतुबंध हा काव्यसंग्रह लिहिला.
- त्याने राजधानी प्रवरपूर येथे हलवली. तेथे रामाचे मंदिर बांधले.
- वाकाटक राजवंशातील आतापर्यंत सापडलेल्या ताम्रपटातील शिलालेख (सर्व 17) प्रवरसेना II संबंधित
- परमेश्वर ही पदवी धारण केली.

5) नरेंद्र सेन: ( इ. स. 450 ते470)

- प्रवरसेन दूसरा याचा पुत्र . पत्नी अजिता भट्टारिका , कदंब राजाची राजकन्या.

6) पृथ्वी सेन दूसरा: ( इ. स. 470 ते 490 )

- नरेन्द्रसेन चा पुत्र. नल राजाला विदर्भातून हाकलून लावले.
- विष्णूचा उपासक . याच्या मृत्यू नंतर वकटकांची ज्येष्ठ शाखा नष्ट झाली ती वाशिम च्या वाकाटकांनी जिंकून घेतली.

## वाशिम शाखा : वत्सगुल्म

1) सर्वसेन : ( इ. स. 330 ते 355)

- या शाखेचा संस्थापक ; विंध्य ते गोदावरी पर्यन्त विस्तार .
- धर्म महाराज ही पदवी. कवि म्हणू प्रसिदध . हरीविजय नावाचे प्रकृत काव्य रचले.

2) विंध्यसेन : ( इ. स. 355 ते 400 )

- विंध्यशक्ती दूसरा म्हणून ओळखला जातो.
- गावाला दान दिल्याचा उल्लेख ताम्रपटवरून समजतो. उत्तरेकडील मार्गावरील गाव – नंदिक्त म्हणजे नांदेड
- दक्षिणेकडील कुंतल राजाचा पराभव केला.

2) हरीसेन : ( इ. स. 465 ते 500)

- देवसेन चा पुत्र .
- कुंतल , कोसल , कलिंग , अवंति , माळवा हे जिंकून घेतले.
- बौद्ध धर्मीय वराह देव याचा सचिव .
- हुनांची आक्रमणे व कलचुरी घराण्याचा उदय याने वाकाटकांची सत्ता सहव्या शतकात संपुष्टात आली.

## राज्यव्यवस्था व प्रशासन व्यवस्था

- राजपद वंश परंपरेने .
- स्त्रियांनी राज्यकारभार पाहिला.उदा. प्रभावती.
- भोग किंवा भुक्ती - प्रांताचे विभाजन प्रमुख उपरिक
- विषय – भुक्तीचा उपविभाग . विषयपती हा प्रमुख.
- मार्ग – विषयपेक्षा लहान
- ग्राम – गाव किंवा खेडे.
- कटक - नगर प्रशासनासाठी